**ठळक बातम्या**

- पुद्दुचेरीसह चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकीसाठी उद्या मतमोजणी
- येत्या जून महिन्यात पेट्रोलचं अधिक उत्पादन घेण्याचा पेट्रोल निर्यातदार देशांच्या संघटनेचा निर्णय
- अमेरिकेबरोबरच्या चर्चेतली कोंडी फोडण्यासाठी इराणकडून नवा प्रस्ताव, मात्र तो समाधानकारक नसल्याची अमेरिकेच्या अध्यक्षांची भूमिका
- नवी दिल्लीत एका इमारतीत लागलेल्या आगीत ९ जणांचा मृत्यू

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबादमध्ये झालेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सचा सनरायझर्स हैदराबादवर सात गडी राखून विजय

**<><><><><>**

पश्चिम बंगाल, आसाम, केरलम्, तामिळनाडू आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकीसाठी उद्या मतमोजणी होणार आहे. पश्चिम बंगाल मधल्या २९४ पैकी २९३, तामिळनाडू २३४, आसाम १२६, केरलम् १४० आणि पुदुच्चेरी मध्ये ३० जागांसाठी, झालेल्या मतदानाची मोजणी उद्या एकाच वेळी होणार आहे. मतमोजणीसाठी सर्वत्र यंत्रणा सज्ज आहेत.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीसाठी निवडणूक आयोगाने अतिरिक्त निरीक्षक आणि पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. मतमोजणी निरीक्षकांच्या मदतीसाठी अतिरिक्त १६५ निरीक्षक, तर मतमोजणी केंद्राच्या आसपास सुरक्षेसाठी ७७ अतिरिक्त पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. तमिळनाडू, पुद्दुचेरी इथंही चोख बंदोबस्त तैनात केला आहे. आसाममध्ये राज्य सशस्त्र पोलिसांच्या ९३ तुकड्या विविध जिल्ह्यांमध्ये आधीच तैनात केल्या आहेत.

पश्चिम बंगाल मध्ये २३ आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यात मतदान झालं होतं तर तामिळनाडू मध्ये २३ एप्रिल रोजी एका टप्प्यात आणि आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी इथं ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान झालं होतं.

महाराष्ट्रातल्या बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीची मतमोजणीही उद्या होणार आहे.

<><><><><>

पश्चिम आशियामधला संघर्ष अद्याप सुरुच असल्यानं ओपेक अर्थात पेट्रोल निर्यात करणाऱ्या देशांच्या संघटनेनं येत्या जून महिन्यात पेट्रोलचं अधिक उत्पादन घेण्याचा निर्णय घेतला आहे. सात ओपेक प्लस देशांनी पुढच्या महिन्यात तेल उत्पादनाचं लक्ष्य दररोज अंदाजे १ लाख ८८ हजार बॅरल इतकं वाढवायला तत्वतः सहमती दर्शवली आहे. संयुक्त अरब अमिरात अलीकडेच या गटातून बाहेर पडल्यानंतर आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या जलवाहतुकीवर मोठ्या प्रमाणावर निर्बंध येत असल्यानं हे पाऊल उचलण्यात आलं आहे.

<><><><><>

अमेरिकेबरोबरच्या शांततेच्या चर्चेतली कोंडी फोडण्यासाठी इराणने आज अमेरिकेसमोर बहुस्तरीय प्रस्ताव सादर केला. पाकिस्तानी अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, इराणच्या या प्रस्तावात पश्चिम आशियातला संघर्ष कमी करण्यासाठीची योजना असून ती टप्प्याटप्प्याने राबवण्याविषयी सुचवण्यात आलं आहे. अमेरिकेने आपलं लष्कर मागे घेतलं आणि इराणवरच्या तेलनिर्यातीच्या निर्बंधासह आर्थिक दबाव शिथिल केला तर होर्मुझच्या सामुद्रधुनी परिसरातले निर्बंध कमी होतील, असं इराणने आपल्या प्रस्तावात म्हटलं आहे. मात्र, इराणने सध्या सुरू असलेल्या संघर्षाला दीर्घकाळ चालेल्या अणुविषयक वादापासून वेगळं ठेवलं आहे.

मात्र, पश्चिम आशियातला संघर्ष संपवण्यासाठीच्या इराणने ठेवलेल्या प्रस्तावावर आपण समाधानी नसल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

नसरापूर इथल्या बालिकेवरचा अत्याचार आणि हत्या ही गंभीर घटना असून नागरिकांचा रोष साहजिक आहे, मात्र या आरोपीला कठोर शिक्षा होईल याची काळजी राज्य सरकार घेत आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. ते नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. हा खटला जलदगती न्यायालयात चालावा यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**- होल्ड बाईट मुख्यमंत्री - -**

**<><><><><>**

पुणे जिल्ह्यात नसरापूर इथं बालिकेवरल्या अत्याचार आणि हत्येचा राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी निषेध केला आहे. ही घटना अतिशय क्लेशदायक असून मानवतेवरचा कलंक आहे, अशा शब्दात त्यांनी भावना व्यक्त केल्या. याप्रकरणी महिला आयोगाने राष्ट्रीय बालहक्क सुरक्षा आयोगाला पत्र लिहलं असून तात्काळ कारवाई करण्याची विनंती केल्याचं रहाटकर यांनी सांगितलं.

हे प्रकरण माणुसकीला काळिमा फासणारं असल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी दिली आहे. अशा घटना रोखण्यासाठी राजकीय श्रेयवाद बाजूला ठेवून 'शक्ती कायदा' तातडीने लागू करावा, अशी मागणी त्यांनी केली.

**<><><><><>**

नवी दिल्लीत आज सकाळी विवेक विहार इथल्या एका इमारतीत आग लागून झालेल्या दुर्घटनेत ९ जणांचा मृत्यू झाला. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे बंब ताबडतोब घटनास्थळी रवाना झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी १५ जणांची सुटका केली.

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी या दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबांयांना प्रधानमंत्री राष्ट्रीय निधीतून प्रत्येकी २ लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

मध्यप्रदेशमध्ये जबलपूर इथं बार्गी धरण परिसरात जहाज उलटून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १३ वर पोहोचली आहे. बचाव पथकानं आज  एका पाच वर्षीय मुलाचा आणि त्यांच्या काकांचा मृतदेह बाहेर काढला. त्यामुळे या दुर्घटनेनंतर बेपता झालेल्या सर्व १३ जणांचा शोध आता लागला असल्याचं पोलिसांनी सांगितलं. या बचावकार्यात आग्रा इथून विमानानं आणलेल्या लष्कराच्या सुमारे २० पाणबुड्यांचा समावेश असलेली पथकं, राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान आणि स्थानिक पाणबुड्या यांचा समावेश होता. वादळामुळे जहाज भरकटल्यानं हा अपघात झाला, त्यावेळी त्यात ४१ प्रवासी होते, त्यापैकी २८ जणांना वाचवण्यात यश आलं होतं.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबादमधे राजीव गांधी मैदानावर झालेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सनं सनरायझर्स हैदराबादवर सात गडी राखून विजय मिळवला. सनरायझर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र निर्धारित २० षटकांच्या आधीच, १९ षटकात १६५ धावांवर त्यांचा डाव संपला. ही धावसंख्या कोलकाता नाईट रायडर्सनं अंगक्रीश रघुवंशीचं शानदार अर्धशतक आणि अजिंक्य राहणेच्या ४३ धावांच्या खेळीच्या जोरावर तीन गड्यांच्या मोबदल्यात, सामन्यातले १० चेंडू बाकी असताना पार केली.

या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी मैदानावर गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात सुरु आहे. गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. पंजाब किंग्जची सुरुवात खराब झाली. शेवटची बातमी हाती आली तेव्हा त्यांच्या ७ षटकात ४ बाद ३९ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

बंगळुरूच्या गॅलेक्स आय या स्टार्टअपनं तयार केलेल्या मिशन दृष्टी या उपग्रहाचं आज कॅलिफोर्निया इथं स्पेसेक्सच्या फाल्कन ९ या रॉकेटवरून अंतराळात प्रक्षेपण करण्यात आलं. १९० किलो वजनाचा 'मिशन दृष्टी' हा खासगी भारतीय कंपनीने बनवलेला सर्वात मोठा उपग्रह आणि इलेक्ट्रो-ऑप्टिकल आणि सिंथेटिक अपार्चर रडार सेन्सर्स या दोन गोष्टींचं एकत्रीकरण करणारा हा जगातला पहिला ऑप्टोसार उपग्रह आहे. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, माहिती आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री यांनी या यशाबद्दल गॅलेक्सी आय या स्टार्टअपचं अभिनंदन केलं.

<><><><><>

एम्स अर्थात भारतीय आयुर्विज्ञान संस्थेनं पाठीच्या कण्याच्या व्यंगावर उपचार करण्यासाठी शस्त्रक्रियेचं नवीन तंत्र विकसित केलं आहे. गेल्या सात वर्षांपासून या प्रक्रियेचा वापर केला जात असून ज्या रुग्णांना शस्त्रक्रियेपासून धोका आहे किंवा ज्यांना उपचाराचे मर्यादित पर्याय उपलब्ध आहेत अशांसाठी हे नवं तंत्र आशेचा नवा किरण आहे, असं एम्सने निवेदनाद्वारे म्हटलं आहे. नव्या तंत्रामुळे शस्त्रक्रियेतली गुंतागुंत कमी होते, असं एम्सने म्हटलं आहे.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३ मे २०२६ - रविवार

<><><><><>

आधार कार्डच्या चेहऱ्यामोहऱ्यात येत्या वर्षअखेरपर्यंत बदल होऊ शकतो या वृत्ताचं केंद्रीय दूरसंचार आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं खंडन केलं आहे. आधार कार्डावर केवळ छायाचित्र आणि क्यू आर कोड इतकेच संदर्भ असतील, अशा आशयाच्या काही बातम्या सध्या काही वृत्तवाहिन्या आणि समाजमाध्यमांवर दाखवत आहेत. मात्र असे बदल करण्याची कोणतीही योजना सरकारच्या विचाराधीन नाही आणि नागरिकांनी अशा वृत्तांवर विश्वास न ठेवता भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाच्या अधिकृत समाजमाध्यमांवर तसंच पत्र सूचना कार्यालयाच्या पत्रकावरच विश्वास ठेवावा, असं आवाहन मंत्रालयानं केलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची निवड करण्यात आली आहे. पुण्यात बालेवाडी इथं झालेल्या महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या कार्यकारिणीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

//<><><><><>//